☎- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☎ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 360 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 19 / 09 / 2025

# पोलीस अधीक्षक कार्यालय येथे कायदा व सुव्यवस्था अनुषंगाने शांतता व समन्वय बैठक..

नांदेड जिल्हयातील मागील दोन दिवसापुर्वी दोन समाजात निर्माण झालेल्या वादावरून मिडीयामध्ये तेढ निर्माण होणारे स्टेटस/वक्तव्य प्रसारीत होत असल्याने जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी **मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधिक्षक, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली **मा श्री सुरज गुरव**, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड शहर यांचे उपस्थितीत पोलीस अधीक्षक कार्यालय येथे जिल्हयातील मराठा व ओबीसी समाजातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांचेसोबत दिनांक 19.09.2025 रोजीचे 16.00 वा. शांतता व समन्वयासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले.

दोन्ही समाजात शांतता व समन्वय राहावा या करीता पोलीस प्रशासनाचे वतीने दोन्ही समाजातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांना शांतता राखून कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, कोणीही जातीय भडकावू वक्तव्य करू नये, सोशल मिडियावर अफवा, चुकीची माहिती प्रसारीत करू नये, दोन्ही समाजाच्या प्रतिनिधीनी सवांदातून प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करावा, स्थानिक पातळीवर कोणताही वाद निर्माण झाल्यास तात्काळ पोलीस प्रसाशनास कळवावे तसेच स्थानिक वाद विवाद स्थानिक गावकरी यांनी आपसात सोडवावे बाबत सदर शांतता कमिटीच्या बैठकीत दोन्ही समाजातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांना सुचित करण्यात आले.

दोन्ही समाजातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी देखील पोलीस प्रशासनाने दिलेल्या सुचनांना सकारात्मक प्रतिसाद देत पोलीस प्रशासनाच्या सुचनेच्या अनुषंगाने नांदेड जिल्हयामध्ये दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी कोणतीही कृती करणार नाही, सर्व प्रश्न संविधानीक मार्गाने सोडविणार, मोर्चे, मिरवणुका शांततेत काढणार व कुठलेही गैरकायदेशीर कृत्य करणार नाही बाबत स्वताहून सांगितले आहे. तसेच सोशल मिडीयाच्या बाबतीत जबाबदारीने वागावे कोणतेही भडकाऊ अथवा चुकीचे कमेंट अथवा स्टेटस प्रसारीत करू नये,एखादया गावात काही अनुचित प्रकार घडल्यास गावा बाहेरील लोकांनी त्वरीत हस्तक्षेप करू नये संबंधीत घटने बाबत पोलीस प्रशासनाकडून खात्री करावी बाबत सांगण्यात आले.

सदर शांतता कमिटी बैठकीस श्री पंजाब काळे, श्री अविनाश भोसीकर, श्री श्याम पाटील वडजे, श्री चंद्रसेन पाटील, श्री दशरथ कपाटे, श्री भिमाशंकर कापसे, श्री सुभाष कोल्हे, श्री नामदेव आईलवाड, श्री संकेत पाटील, श्री सुनिल कदम, श्री रामचंद्र येईलवाड यांचेसह इतर मराठा व ओबीसी समाजाचे पदाधिकारी व कार्यकर्ते हजर होते.

नांदेड जिल्हा पोलीस दलाचे सर्व बाबींवर बारकाईने लक्ष असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीसांना सहकार्य करावे जिल्हयातील शांतता अबाधित ठेवणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.काही सामाजीक/धार्मिक बाब निदर्शनास आल्यास नजीकच्या पोलीस स्टेशनला संपर्क करावा. सोशल मिडीयावर दोन समाजात तेढ निर्माण होणारे स्टेटस/वक्तव्य सोशल मिडीयावर प्रसारीत करू नये अथवा संबधितांवर कायदेशीर कडक कार्यवाही करण्यात येईल असे मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी आवाहन केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड